## सातारा पोलीस दलातील 'आझाद' ठरला महाराष्ट्रात अव्वल; राज्यस्तरीय पोलीस कर्तव्य मेळाव्यात पटकावली ३ सुवर्णपदके

पुणे येथे दिनांक ४ ते १० ऑक्टोबर २०२६ दरम्यान पार पडलेल्या २१ व्या राज्यस्तरीय पोलीस कर्तव्य मेळाव्यात सातारा जिल्हा पोलीस दलातील बॉम्ब शोधक व नाशक पथकाच्या (BDDS) 'आझाद' या श्वानाने दैदीप्यमान कामगिरी बजावत महाराष्ट्रात अव्वल स्थान पटकावले आहे. आझादने या स्पर्धेत एकूण ३ सुवर्णपदके आणि 'बेस्ट डॉग ऑफ कम्पिटिशन'चा चषक जिंकून सातारा पोलीस दलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातील परिक्षेत्र व आयुक्तालयांचे २४ संघ आणि तब्बल ४७ श्वान सहभागी झाले होते. यापूर्वी ऑगस्ट २०२६ मध्ये कोल्हापूर येथे झालेल्या परिक्षेत्रीय पोलीस कर्तव्य मेळाव्यातही 'आझाद'ने स्फोटक शोधणे प्रकारात सुवर्णपदक आणि 'बेस्ट डॉग'चा किताब जिंकला होता.

२१ व्या राज्यस्तरीय स्पर्धेत 'आझाद'ने सुवर्णपदक मिळवून राष्ट्रीय स्पर्धेसाठी (AIPDM) स्थान मिळवले आहे. श्वान स्पर्धा प्रकारात सातारा बीडीडीएस पथकातील श्वान आजाद हा **बेस्ट डॉग ऑफ कॉम्पिटिशन** ठरला. माननीय पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य श्री. सदानंद दाते साहेब यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.
श्वान 'आझाद'ची ऐतिहासिक कामगिरी:

**स्फोटक पदार्थ शोधणे** (Explosive Detection): ४०० पैकी ३५५ गुण मिळवून सुवर्णपदक पटकवले.

**बेस्ट डॉग ऑफ कम्पिटिशन**: २०२६ या वर्षापासून नव्याने सुरू करण्यात आलेला हा मानाचा पुरस्कार 'आझाद'ने पटकावला.

**ओबेडियन्स व रिफ्युजल ऑफ फूड** (आज्ञाधारकपणा व अन्न नकार): या प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक मिळवले.

**राष्ट्रीय स्तरावर (AIPDM)** निवड:

राज्यस्तरीय स्पर्धेतील या यशानंतर श्वान **'आझाद'**ची मुंबई येथे होणाऱ्या ७० व्या अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यासाठी (AIPDM) निवड झाली आहे. यापूर्वी ६८ व्या AIPDM स्पर्धेत 'सातारा BDDS चा श्वान **'सूर्या'** याने आणि ६९ व्या AIPDM स्पर्धेत सातारा श्वानपथक मधील श्वान **'सूचक'** यांनी महाराष्ट्र संघांसाठी सुवर्णपदक जिंकले होते. सातारा जिल्हा पोलीस दलाची मान उंचावली होती आता 'आझाद'च्या रुपाने सलग तिसऱ्या वर्षी सुवर्णपदकाची परंपरा कायम ठेवण्याची संधी सातारा पोलीस दलाला मिळाली आहे.

**यशस्वी मार्गदर्शक व हँडलर**: श्वान 'आझाद'च्या या अलौकिक यशामागे त्याचे हँडलर पो.हवा. रूपेश साळुंखे आणि पो.कॉ. प्रविण आहिरे यांचे मोलाचे योगदान राहिले आहे.

तसेच या यशाबद्दल विशेष पोलीस महानिरीक्षक श्री.रंजनकुमार शर्मा, सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.निखिल पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडुकर, श्री.कृष्णराव जाधव पोलीस उपअधीक्षक (गृह) ,श्वान प्रशिक्षण केंद्र (पुणे) चे पोलीस उपअधीक्षक श्री.संजय नेरकर व श्री.राजेश चव्हाण, BDDS पथक पोउनि. श्री.विश्वास कडव, प्रशिक्षक सफौ. गजानन मोरे, पो.हवा. संतोष शिंदे व दत्तात्रय चव्हाण आणि पथकातील सर्व सहकाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

"राष्ट्रीय स्पर्धेतही सुवर्णपदकाची परंपरा कायम ठेवू" – पो.हवा. रूपेश साळुंखे (हँडलर)

मुंबईत होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत सातारा पोलीस दलाची सुवर्णपदक मिळवण्याची परंपरा अखंडित ठेवण्यासाठी पूर्ण ताकदीने प्रयत्न करू असा विश्वास प्रशिक्षक आणि श्वान हस्तक यांनी व्यक्त केला आहे.